सोमवार, दि. ८ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १०५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सदर बाजार हद्दीतील पडद्याआड लॉटरीकडे मोर्चा वळवावा

# तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांचा ‘अवैध खेळ’ संपवा

## उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या पथकाकडून कारवाईची अपेक्षा

**दीपक शेळके**

**जालना** - सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुख्य मार्गावरील सट्टेबाजांवर उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ) अनंत कुलकर्णी यांच्या पथकाने केलेल्या धडक कारवाईनंतर परिसरातील पोलीस व्यवस्थेची वास्तविकता उघडकीस आली आहे. शनिवारी (दि. ०६ डिसेंबर २०२५) करण्यात आलेल्या या कारवाईनंतर नागरिकांकडून उपविभागीय पथकाचे सर्वत्र कौतुक होत असून, या पथकाकडून आता पुढील निर्णायक कारवाया होण्याची अपेक्षा वाढली आहे.

विशेषतः सदर बाजार हद्दीत फोफावलेल्या अनधिकृत लॉटरी व्यवसायावर आता तातडीने उतारा काढावा, अशी जोरदार मागणी होत आहे. धडक कारवाईनंतर संपूर्ण शहरात एकच चर्चा आहे, जे सदर बाजार ठाण्याच्या पोलिसांना दिसत नाही, ते एसडीपीओंच्या पथकाला कसे दिसते? या एका कारवाईने सदर बाजार पोलिस ठाण्यातील कारभारावर जणू शिक्कामोर्तब केले आहे. नागरिकांचे अपेक्षा ढगाने भरून आल्या असून मुख्य मागणी आहे, तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांचा ‘अवैध खेळ’ संपवा म्हणजे अवैध लॉटरी सेंटर त्वरित बंद करावेत.

सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत अनेक ठिकाणी पडदे टाकून अवैध लॉटरी चालू आहे. येथे नंबर लावण्यासाठी तरुणांची गर्दी असते. मोठ्या रकमेचे व्यवहार हातोहात होताहेत. कोणतेही परवाने नाहीत. काही ठिकाणी पोलीस गस्ती वाहन येते-जाते तरी त्यांना हे सेंटर दिसत का नाही? दिसत नाही, की मुद्दाम पाहायचे नाही? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो आहे.

**कोट्यवधी रुपयांची ‘अनधिकृत अर्थव्यवस्था’**

अवैध लॉटरी व्यवसाय झपाट्याने वाढतो आहे. याचा सर्वाधिक फटका बसतो तरुण व निम्नवर्गीय कुटुंबांना बसतो आहे. रोज ५० ते ५०० रुपये परवडतील असे छोटे ‘बेट’ पासून सुरुवात होत असली तरी महिन्याच्या अखेरीस हजारोंची उधळपट्टी होते आहे. परिणामी कुटुंबातील आर्थिक गणित विस्कळीत होत आहे. या लॉटरीमुळे आशा-निराशेची मानसिक ताणतणाव निर्माण होत आहे. तरुण छोटे-मोठे कर्ज काढत आहेत. घरगुती भांडणं होत आहे. काही तरुणांनी मोबाईल, दागिनेदेखील विक्रीला काढल्याच्या अनेक तक्रारी ऐकण्यात येत असतात.

**गुन्हेगारीला खतपाणी**

अवैध लॉटरी म्हणजे ‘कॅश फ्लो’चे खुले शस्त्र आहे. त्यामुळे याला बळी पडलेला तरुण पुढे स्थानिक दादागिरी, चिल्लर वसुली, बेकायदेशीर व्यवहार करतो पैशासाठी वाम मार्गाला लागतो आहे. असे असतांना पोलीस अधिकारी दुर्लक्ष का करतात, हा मोठा प्रश्न आहे. एका महिलेने युवा आदर्शशी बोलतांना सांगितले की, माझा मुलगा बारावीत शिकतो. मित्राच्या सांगण्यावरून लॉटरी लावायला लागला. दिवसाला १०-२० रुपये खर्च समजा म्हणत होतो, पण हळूहळू ते २००-३०० वर गेले. आता आमचे घरच विस्कटले आहे. याला आळा घालणारा कुणीच नाही का? अशी परिस्थिती केवळ एका घराची नाही, तर संपूर्ण भागाची वस्तुस्थिती आहे.

**गस्ती वाहनं जातात, पण काय पाहतात?**

लॉटरी सेंटर उघडे असतात, लोकांची गर्दी असते. अशा ठिकाणांहून सदर बाजार पोलीसांचे गस्तीचे वाहन जाते पण ते काय पाहतात? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

याचा अर्थ पोलिसांकडे माहिती नाही (जे अशक्य वाटते) किंवा मुद्दाम डोळेझाक केली जाते. दोन्ही परिस्थिती सदर पोलीस पोलीस प्रशासनासाठी लाजिरवाणी आहेत.

उपविभागीय अधिकारी यांचावर ‘एकमेव विश्वास’

६ डिसेंबरच्या कारवाईनंतर जालना शहरात एकच सूर असून एसडीपीओ कुलकर्णी यांच्यावरच विश्वास आहे. तेच कारवाई करतील.

उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडून आता जनतेला सट्टेबाजांवर नेमकी माहिती जमा करून थेट धाड टाकण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर सदर बाजार पोलिस ठाण्याच्या गस्ती पथकाची चौकशी, या नेटवर्कच्या मूळ सूत्रधारांना अटक, तरुणांसाठी जनजागृती मोहीम राबवावी.

> सदर बाजार हद्दीतील अवैध लॉटरी व्यवसाय फक्त एक ‘लहानसा अवैध धंदा’ नाही. तो तरुणांचे स्वप्ने, कुटुंबांची बचत आणि समाजाची शांतता उद्ध्वस्त करणारे साम्राज्य आहे. उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी सट्टेबाजांवर केलेली सुरुवातीची कारवाई हेच दाखवते की पोलिसांकडे इच्छाशक्ती असेल, तर गुन्हेगारांना थारा नाही.
>
> सदर बाजार पोलीस ठाण्यातील कोणत्या अधिकाऱ्याची बदली झाली आणि तो अद्यापही सदर बाजार पोलीस ठाण्यातच कसा? वाचा उद्याच्या अंकात...

उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या धाडसी कारवाईने जालना शहरात पोलीस प्रशासनावरील विश्वास पुन्हा एकदा जागृत झाला आहे. परंतु हे पाऊल पुरेसे नाही. सदर बाजारमध्ये फोफावलेल्या अवैध लॉटरीसारख्या आणि इतर गुन्हेगारांवर जर कठोर कारवाई केली गेली तरच तरुणांचे, कुटुंबांचे आणि शहराच्या सामाजिक आरोग्याचे रक्षण होऊ शकते.

शहराचे भविष्य वाचवण्यासाठी कठोर निर्णय आवश्यक आहे. आता शहराची नजर एकाच दिशेने आहे की, अवैध लॉटरीवर निर्णायक, निर्भीड आणि जाहीर कारवाई कधी होते?



वादग्रस्त विधानाने
व्हिडीओ लागे गाजू
निगेटिव्ह पध्दतींनी
प्रसिद्धी लागे माजू
तत्पर असे मिडीया
वॉररुम लागते सजू
ब्रेकिंग न्यूज खाद्य
विषय नव्यांनी रूजू
धगधगे अग्नीतांडव
रे कोण घेणार बाजू
इतर अनेक समस्या
हळूवार पडते बाजू
विरोधक सत्ताधारी
चला एकदुजा झुंजू
रात्रभर गोंधळ चाले
आता लागे झुंजूमुंझू
डोक्यासोबत खायचे
बदाम अक्रोड काजू
कुणाला कसली पर्वा
घोंगडे लागू द्या कुजू
अभिव्यक्ती स्वातंत्र्य
बोलायला नका लाजू
तेल टाकणारे अनेक
धगधग लागता विझू
कुणी यांच्या हातात
कधी द्यायचा तराजू
कधी तरी जाणू घ्यावी
नाण्याला दुसरी बाजू

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# नैसर्गीक अनुदान घोटाळ्यातील तलाठी किरण जाधव यास सहाय्य करणारा कोतवाल अटकेत

## तलाठी आणि कोतवाल यांना १० डिंसेबर पर्यत पोलीस कोठडी; आर्थिक गुन्हे शााखेची कामगीरी

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. त्यामध्ये अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबधत अधिकारी कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर परत घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणात सत्यता पडताळणी साठी चौकशी समीती गठीत केली होती.

चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये रु २४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) इछ्ड सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना करीत आहे.

सदर गुन्हयात आता पावेतो १० आरोपीना आर्थिक गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण २८ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. फिर्यादी मधील आरोपीना मदत करणारे खाजगी एंजट आणि तलाठयांचे सहाय्यक कोतवाल हे सुध्दा तपासात दोषी आढळुन आले असल्याने त्यांचे सहभाग निष्पन्न करुन त्यांचे सहभागाप्रमाणे व मिळालेल्या पुराव्याच्या आधारे आता कोतवाल व खाजगी एंजट यांना सुध्दा गुन्हयात अटक करण्याचे काम आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे. त्यामुळे आरोपीची सख्या वाढत आहे.

गुन्हयातील फरार आरोपींचा शोध घेत असताना दिनांक ०६/१२/२०२५ रोजी गुन्हयातील तलाठी आरोपी नामे किरण रविंद्र जाधव वय ३६ वर्ष व्यवसाय नौकरी तलाठी सजा पानेगाव तहसील अंबड रा. देऊळगाव राजा ता. जि. बुलढाणा ह.मु. अंबड ता. अंबड जि. जालना. हा छत्रपती संभाजीनगर येथे मिळुन आल्याने त्यास अटक करण्यात आली. आरोपीकडे केलेल्या चौकशीत आणी यापुर्वी झालेल्या तपासा दरम्यान निष्पन्न झालेल्या पुराव्या आधारे तलाठी किरण जाधव याचा सहाय्यक अशोक रामभाऊ शिंदे वय ५२ वर्षे (कोतवाल) यास दिनांक १६/१२/२०२५ रोजी रात्री उशीराने अटक करण्यात आली आहे. आज रोजी दोन्ही आरोपीताना मा. अंबड न्यायालयात पान २ वर

# बस स्थानक परिसरात ‘ट्रॅव्हल्स’चा उधळंपट्टा!


## वाहतूक ठप्प, अपघात वाढले; कलेक्शनसाठी जीवाशी खेळू नका! मनसेचा इशारा

**जालना । प्रतिनिधी** - जालना बस स्थानक परिसर, जो शहराच्या मध्यभागी असून सर्वाधिक वर्दळीचा भाग मानला जातो, हा मागील काही महिन्यांपासून विना-अनुमती ट्रॅव्हल्सच्या मनमानीने अक्षरशः कोंडीग्रस्त झाला आहे. रात्रीच्या वेळी ट्रॅव्हल्स वाहनांचा अनियंत्रित वावर इतका वाढला आहे की वाहतूक संपूर्ण ठप्प होते. स्थानिकांना मार्गक्रमण करणे कठीण झाले आहे, तर अपघातांचे प्रमाणही चिंताजनकरित्या वाढले आहे.



या गंभीर प्रकारावर मनसेचे जिल्हा सचिव विलास तिकांडे यांनी सरळ आरोप लावत शहर वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांवर चिरीमिरी (घूस) घेण्याचा आरोप केला असून, त्वरित बंदोबस्त न झाल्यास मनसे स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

बस स्थानकात बेकायदा ट्रॅव्हल्सचा दादागिरीसारखा वावर वाढला असून परवानगी नसलेल्या अनेक ट्रॅव्हल्स गाड्या रात्रीच्या वेळी बस स्थानक परिसरातून ये-जा करतात. थांबण्याची, वळण घेण्याची, प्रवासी चढवण्याची ठराविक जागा नसल्याने वाहतूक बोंबलते. ट्रॅव्हल्स चालक मनमानी पार्किंग करतात; त्यामुळे रस्त्यावर १५-२० मिनिटे कोंडी. ऑटो, दुचाकी, चारचाकी यांचा जीव धोक्यात आला आहे. हा परिसर MSRTCचा असून, बाहेरील खाजगी ट्रॅव्हल्सना येथे थांबण्याची परवानगी नाही. तरीही प्रशासन पूर्णपणे मौन बाळगत असल्याची टीका नागरिक करत आहेत.



**एकाचा जीव वाचला- उद्या कोण तरी मरेल! : तिकांडे**

विलास तिकांडे यांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार एका ट्रॅव्हल्सने चुकीचे वळण घेतले. त्यावेळी समोरून येणाऱ्या वाहनाचा थरकाप उडाला. थोडक्यात मोठा अपघात टळला. पण हा जीव गेला असता तर जबाबदार कोण? हे अधिकारी की हे बेकायदा ट्रॅव्हल्स मालक? तिकांडे यांनी पुढे अधिक संताप व्यक्त केला ते म्हणाले, तुमच्या कलेक्शन आणि नोटांसाठी लोकांच्या जीवाशी खेळू नका! हा प्रकार ताबडतोब बंद करा. नाहीतर मनसे स्टाईलने वाहतूक शाखेच्या दारात आंदोलन करू

**पोलिसांची निष्क्रियता की संगनमत?**

या भागात रोज ट्रॅव्हल्सची धिंगाणा सुरू असताना पोलीस प्रशासनास हे का दिसत नाही. तक्रारी पान २ वर

# पतीच्या तोलामोलाचे राहणीमान हा पत्नीचा हक्कच!

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**जालना । प्रतिनिधी** - हा निकाल म्हणजे स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा आणि सन्मानाचा विजय आहे. विभक्त झाल्यानंतरही पत्नीला तिच्या वैवाहिक जीवनातील राहणीमानानुसार जगण्याचा पूर्ण अधिकार आहे, हे सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा अधोरेखित केले असल्याची माहिती ॲड. महेश एस. धन्नावत, कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन यांनी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासंदर्भात ॲड. धन्नावत म्हणाले की, घटस्फोटानंतर पत्नीला सन्मानजनक जीवन जगता यावे आणि तिचे राहणीमान पूर्वीप्रमाणेच राखले जावे, या दिशेने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. एका न्यायाधीश पतीला घटस्फोटानंतर पत्नीला कायमस्वरूपी पोटगी म्हणून ५० लाख रुपये देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. पती एका जबाबदार सार्वजनिक पदावर (न्यायाधीश) असल्याने, पत्नी आणि मुलीला योग्य, पुरेशी आणि सन्मानजनक आर्थिक सुरक्षा सुनिश्चित करण्याची त्याची जबाबदारी अधिक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

हे प्रकरण पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. उच्च न्यायालयाने पती-पत्नीचा घटस्फोट मंजूर करताना पत्नीला ३० लाख रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाविरुद्ध पत्नीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

या प्रकरणात, पती-पत्नीचे लग्न २००८ मध्ये झाले होते. पती सध्या कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत, तर पत्नी पूर्वी अतिरिक्त महाधिवक्ता म्हणून कार्यरत होत्या, परंतु सध्या त्या वकिली करत नाहीत. २०१२ पासून, म्हणजेच गेल्या १३ वर्षांपासून पान २ वर

## संपादकीय पान

# भारत रशिया दृढ मैत्री

रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांचा दोन दिवसांचा ऐतिहासिक भारत दौरा नुकताच पार पडला. पुतिन यांच्या या भारत दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. युक्रेन रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर आणि अमेरिका - भारत यांचे संबंध दुरावल्यानंतर पुतिन यांचा हा पहिलाच दौरा असल्याचे या दौऱ्याकडे अमेरिकेसह संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. पुतिन यांच्या या दौऱ्याकडे अमेरिकेचे विशेष लक्ष होते मागील काही महिन्यांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क ( टेरीफ ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला होता अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला त्याचाच परिपाक म्हणजे पुतिन यांचा भारत दौरा. पुतिन यांनी भारताचा दौरा करून दोन्ही देशातील मैत्रीचे संबंध दृढ असल्याचेच सिद्ध केले. या दौऱ्यात दोन्ही देशांदरम्यान महत्वाचे करार करण्यात आले. पुतिन भारत दौऱ्यावर आता आले असले तरी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन हे फोनवरून सातत्याने एकमेकांशी संवाद साधून चर्चा करतच होते. ऑगस्ट महिन्यात भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ती भेट झाली होती. एस जयशंकर यांनी त्या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली त्या भेटीत अनेक विषयावर चर्चा केली मात्र त्या भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. त्या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला होता. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन सम ोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे. रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रमही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र पुन्हा एकत्र आले आहेत. रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. या दोन्ही महासत्ता पुन्हा एकत्र आल्या तर त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे. पुतिन यांच्या भारत दौऱ्यानंतर भारत रशिया या दोन जुन्या मित्रांमधील मैत्रीचे संबंध दृढ झाले आहेत हे मात्र नक्की.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# सिंहस्थ कुंभमेळासाठी साधुग्राम अवश्य उभारा; परंतु एकाही झाडाची हत्या होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घ्यावी

नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा ३१ आक्टोंबर २०२६ ला सुरू होणार असून २४ जुलै २०२८ पर्यंत चालेल ही आनंदाची गोष्ट आहे.याचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे आणि व्हायलाच पाहिजे.परंतु कोणताही कार्यक्रम आखतांना पर्यावरणाला विशेष महत्त्व देणे अत्यंत गरजेचे आहे.कारण आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाचा ह्रास देवीदेवता किंवा पर्यावरणवादी सहन करणार नाही.

सरकारने विकासाबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे. पर्यावरण वाचले तरच पुढची पिढी, निसर्ग,पशुपक्षी,औषधीयुक्त वनस्पती,जीवजंतू सुरक्षित राहील याची जाण सरकारने ठेवली पाहिजे.साधुग्रामसाठी सरकार वृक्ष तोडीबद्दल राजकारण होत असल्याचे माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस म्हणतात, परंतु यात तथ्य नाही.कारण जशे-जशे वृक्ष कटाई होत राहिल तशे-तशे सर्वांचेच आयुष्य कमी-कमी होत जाईल ही बाब मुख्यमंत्र्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. वृक्षतोड म्हणजेच मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे आयुष्य दिवसेंदिवस कम ीकमी होणे होय.त्यामुळे वृक्षतोडीला राजकीय उपमा देणे मुख्यमंत्र्यांना शोभत नाही.वृक्ष हे पृथ्वीचा,निसर्गाचा, पर्यटनाचा,मानव-पशुपक्षी-संपुर्ण जीवजंतू यांचा आत्मा आहे. आम्हीही सनातनवादी व हिंदू आहोत.परंतु जो निसर्ग प्राणवायू देतो आणि लाखोंचे प्राण वाचवितो अशा झाडांची कत्तल वर्षभराच्या कार्यक्रम ासाठी तब्बल १८०० पेक्षा अधिक मोठमोठ्या झाडांची कटाई करने म्हणजे ही हत्या नाही तर काय? मुख्यमंत्री म्हणतात की प्रमागराज येथे कुंभमेळ्यासाठी तब्बल १५ हजार हेक्टर जमीन उपलब्ध होती याचे स्वागतच ती जमीन बंजार असावी किंवा तिथे झाडे नसावेत.कारण उत्तरप्रदेश १५ हजार हेक्टर मधील झाडांच्या कटायीची कोणतीही घटना सामोरं आलेली नाही आणि आपण प्रयागराजची तुलना नाशिकशी का करावी?मुख्यमंत्री म्हणतात की प्रमागराज कुंभमेळाव्याच्या तुलनेत नाशिक येथे साधुग्राम साठी केवळ ३५० एकर जमीन आहे.माननीय मुख्यमंत्री महोदय ३५० एकर म्हणजे कमी जागा झाली काय?ही आपली व सरकारची जबाबदारी आहे की ३५० एकरमधील एकही वृक्ष कटायला नकोच. कारण नाशिक ही राज्यासह देशासाठी पावण भुमि आहे सोबतच देशाचे मोठे पर्यटन स्थळ सुध्दा आहे.देश-विदेशातील नागरिक व पर्यटक देवदर्शनासाठी अवश्य येतातच यात दुमत नाही.मुख्यत्वेकरून तपोवनाचा आनंद घेऊन स्वतःला धन्य मानतात.कारण तपोवनात भगवान राम,लक्ष्मण व सीता याची पावन भुमि असल्याने साक्षात भगवान राम यांचे साक्षात दर्शन झाल्याचा भास सर्वांनाच होतो.त्यामुळे सरकारने कोणतेही चुकीचे पाऊल न उचलता साधुग्रामसाठी योग्य ती जागा उपलब्ध करावी. कारण झाडे वाचली तरच पुढची पिढी सुरक्षित राहील अन्यथा झाडांसोबतच मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूंचा ह्यास झाल्याशिवाय रहाणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे तपोवनातील एकही झाड न तोडता साधुग्राम उभारत असेल तर त्याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल.मी सरकारला एक सुचणा देतो की वृक्ष तोडीच्या विरोधात सामाजिक संघटना, नाशिककर, राजकीय पक्ष, अभिनेता सामोरं येतं असेल तर याचे स्वागत सरकारने सुध्दा करावे कारण आपण पहिलेच प्रदुषणाने गुदमरत आहोत याची जाण सरकारने ठेवाली पाहिजे. झाड तोडणीसाठी मुजोरी करून चालणार नाही.आवश्यकता असेल तर झाडांच्या फांद्यांची छाटणी अवश्य करावी.सरकाने तपोवनातील वृक्षतोडीचा प्रश्न सौहार्दपूर्ण पध्दतीने हाताळला पाहिजे आणि पर्यावरण, निसर्ग, पर्यटन,पर्यटक यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही याचीही खात्री केली पाहिजे.मंत्री नितेश राणे पर्यावरणाची तुलना ईदच्या बकरी कापण्याशी करून वादग्रस्त वक्तव्य करतात ही हास्यास्पद बाब आहे .राणे साहेब ईद हा वेगळा मुद्दा झाला यांच्याशी आणि पर्यावरणाशी काहीही संबंध नाही.अहो राणे साहेब १८०० झाडांची कत्तल म्हणजे १८ लाख लोकांचा,पशुपक्षांचा व जीवजंतूची श्वास कोंडून हत्याच ना! याचा आपण विचार का करीत नाही.आम्हाला राजकारण नकोच फक्त पर्यावरण सुरक्षित रहावे,पृथ्वीचे संतुलन सुरक्षित असावे, सर्वांना शुद्ध हवा मि ळावी, पर्यटकांना तपोवनाचा आनंद मिळावा हाच आमचा पर्यावरणवाद्यांचा व जनतेचा खरा उद्देश आहे.नाशिक मनपा प्रशासनाच्या व सरकारच्या निर्णयाचा साधू-महंतांनी कडाडून विरोध करायला हवा.कारण साधू-महंतांचे वास्तव मुख्यत्वे करून हे वृक्षांच्या सानिध्यात असते आणि असायलाच पाहिजे.नाशिकच्या तपोवनाचा इतिहास रामायणाशी सुध्दा जुळला आहे.याच तपोवनात भगवान राम,सीता आणि लक्ष्मण यांनी त्यांच्या १४ वर्षाच्या वनवासातील बराचसा काळ याठिकाणी घालवीला होता. त्यामुळे हे पावण स्थळ राज्यासाठीच नाही तर देशासाठी व जगासाठी ऐतिहासिक स्थळ मानल्या जाते.त्याचप्रमाणे याच स्थळी लक्ष्म णाने शूर्पणखेचे नाक कापले होते असेही सांगितले जाते.आपण रामराज्य प्रस्थापित करण्यासाठी अयोध्येत भव्य राममंदिर उभारले ही देशासाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली बाब आहे.परंतु ज्या तपोवनात भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांचा सहवास होता आणि लक्ष्मणाने ज्या ठिकाणी शूर्पणखेचे नाक कापले अशा ऐतिहासिक आणि पौराणिक वास्तव्याला जर सरकार १८०० वृक्ष कापून काडीमोड करून नेस्तनाबूत करीत असेल तर ही कसली रामराज्याची कल्पना म्हणावी! तपोवनातील एक जरी वृक्ष कटत असेल तर हा मानवजातीवर,पशूपक्षांवर,निसर्गावर,पौराणिक कथांवर व देशातील जनतेच्या भावनांवर मोठा प्रहार समजल्या जाईल. आपण जेव्हा राम राज्याची कल्पना करतो तेव्हा सर्वच बाजूंचा विचार सरकारने केला पाहिजे.प्रश्न रहाला साधू महंतांच्या वास्तव्याचा यासाठी अनेक पर्यायी व्यवस्था सरकार जवळ आहेत.पटांगत, ग्राउंड,शासकीय कॉटेजेस,धर्मशाळा, राजकीय पुढाऱ्यांचे फॉर्म हाऊस व त्यांची शेत जमीन असे अनेक पर्याय आहेत.परंतु साधू महंतांच्या वास्तव्यासाठी तपोवनातील १८०० पेक्षा जास्त वृक्षांची हत्या करून साधूग्राम तयार करने म्हणजे निसर्गाची खुली हत्याच!आज आपण पहात आहोत की, देशासह जगात बदलत्या हवामानामुळे महाप्रलय, सुनामी, भुकंप,अती पाऊस,अती उष्णता यासारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे आणि हा संपूर्ण प्रकार जंगल कटाई व वृक्षतोडीमुळे होत आहे ही बाब सर्वांच्या डोळ्यासमोर आहे तरीही नाशिकम धील ऐतिहासिक तपोवनातील वृक्षांची कत्तल करण्यासाठी सरकार हिरवी झेंडी देत ही अत्यंत दुर्भाग्य पुर्ण बाब आहे.ही अशी गोष्ट झाली की आ बैल मुझे मार. सरकार सांगते की झाडे लावा,झाडे जगवा आणि स्वतः तब्बल १८०० झाडांची कत्तल करायची हा कुठला न्याय म्हणावा!आज एक वृक्ष लावले तर त्याला मोठे व्हायला ५ ते १० वर्षे लागतात आणि नाशिक मनपा प्रशासन व सरकार एकाच वेळेस १८०० वृक्ष कापण्याचा आदेश देत आहे ही फक्त नाशिकलाच नाही तर देशाला घातक सिद्ध होवू शकते.आज देशातील व राज्यातील वृक्षतोडीमुळे प्रदुषणाच्या बाबतीत भारत अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत आहे.जगातील टॉप १०० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी ६५ शहरे एकट्या भारतातील आहेत.यात मुख्यत्वे करून दरभंगा, आसोपूर, पाटणा,नवी दिल्ली, कोलकाता, मुंबई,हैद्राबाद,बंगळूरु, चेन्नई यांचा समावेश आहे आणि आता नागपूर सुध्दा प्रदुषणाच्या छायेत आहे.त्यामुळे प्रदूषणाच्या बाबतीत भारताची चिंता दिवसेंदिवस वाढतच आहे.वाढत्या प्रदुषणाचे मुख्य कारण म्हणजे वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलकटाई, सांडपाणी, मोठ्या प्रमाणात वाहनांचे आवागमन, हवाई वाहतूक इत्यादींम ुळे आज पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण झालाआहे.तपोवनातील एकही वृक्ष कटणार नाही याची जबाबदारी सर्वप्रथम मनपा प्रशासनने व सरकारने घेतली पाहिजे. नाशिककर, निसर्गप्रेमी,समाजसेवी संघटना, अनेक राजकीय पक्ष तपोवनातील वृक्ष तोडीच्या विरोधात उभे ठाकले आहे आणि आता या आंदोलनाला मोठे बळ वृक्षप्रेमी अभिनेते सयाजी शिंदे यांच्यामुळे मिळाले आहे ही स्वागतार्ह बाब आहे. सरकारने वृक्ष लावणे शिकावे व वृक्ष तोडणे टाळावे.आज राज्यातील प्रत्येक शहरापासून ३० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण झालेले आहे.यामुळे लाखोंच्या संख्येने झाडांची खुलेआम कत्तल सरकारने केली आणि याचे प्रायश्चित्त राज्याच्या जनतेला प्रदुषणाच्या माध्यमातून भोगावे लागत आहेत. त्याचप्रमाणे अनेक हिंसक पशु शहराकडे धाव घेत आहेत हा सर्व प्रकार वृक्षतोडीमुळे निर्माण झाला आहे. झाडांच्या कत्तलमूळे दिवसेंदिवस ऑक्सिजनची मात्रा कमी-कमी होत आहे याचे भान सरकारने ठेवले पाहिजे. नाशिक मनपा प्रशासन व सरकार आपण जर चुकीचे पाऊल उचलले तर याचे गंभीर परिणाम राज्याला भोगावे लागतील. सरकारने नाशिककरांच्या भावनांचा,पौराणिक कथांचे वास्तव,निसर्गाची ढासळती परिस्थिती,बदलते हवामान, पर्यटक,पर्यटन या संपूर्ण बाबींचा गांभीर्याने विचार करावा आणि तपोवनातील झाडांच्या कत्तलीचा निर्णय ताबडतोब मागे घ्यावा अन्यथा याचे गंभीर परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागतील.झाडे वाचली तरच पुढची संपूर्ण पिढी सुरक्षित राहील.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## कादराबाद दरगाह कमिटीच्या अध्यक्ष-उपाध्यक्षांसह तिघांवर व्यापाऱ्यास धमकी प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मंगलबाजार परिसरात एका ७८ वर्षीय वृद्ध व्यापाऱ्याला धमकावणे, गाळी-गलौज करणे आणि त्यांच्या मालमत्तेवरील सुरू असलेले बांधकाम थांबवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कादराबाद दरगाह कमिटीचे चेयरमॅन फहीम फालाही, उपाध्यक्ष परवेज जियाउद्दीन आलम आणि जावीद बाबुमियां शेख - या तिघांविरोधात सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी खालेद जानीमियां कुरेशी (वय ७८, रा. मंगलबाजार, जालना) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार त्यांच्या घर-मिळकत क्र. ४४९१/१, मंगलबाजार येथे सुरू असलेल्या बांधकाम ाला आरोपींकडून अडथळा आणण्यात आला. आरोपींनी संगनमत करून बांधकाम ाची जागा वक्फची जमीन आहे असा दावा करत वाद घातला. तसेच शिवीगाळ करत गंभीर धमक्या दिल्या. पुन्हा बांधकाम केले तर गुंडे लावून मारून टाकू. ७८ वर्षीय वृद्ध व्यापाऱ्याला अशा प्रकारे धमकावल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

तक्रारीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात PNC No. १२३५/२०२५ नोंद करण्यात आली असून, ३५१ (२), ३५२, ३(५) बीएनएस २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत हे आरोप गंभीर स्वरूपाचे मानले जात असून, वृद्ध व्यक्तीला धम कावणे हा गुन्हा अधिक गंभीर बनतो.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार/३१७ डिघोळे यांच्याकडे देण्यात आला आहे.

वृद्ध व्यापाऱ्याला धमकावून बांधकाम थांबवण्याचा प्रयत्न हा केवळ वैयक्तिक वाद नसून शहरातील जमीन व मालमत्ता वादांच्या स्वरूपावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे. पोलीस तपासातून वस्तुस्थिती स्पष्ट होईल, मात्र या प्रकरणाकडे शहरातील व्यापारी व नागरिक बारकाईने पाहत आहेत.

## वाचकांचे मनोगत

# मैत्रीपूर्ण की अर्थपूर्ण लढती होणार?

राज्यात सार्वत्रिक निवडणुकांची धामधूम सुरू आहे. नुकत्याच नगरपंचायत, नगरपरिषद निवडणूका झाल्या २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल.जानेवारी २०२६ मध्ये महानगरपालिका, जिल्हा परिषद निवडणूका होतील.निवडणूक कोणतीही असो उमेदवार तेच - तेच असतील.म तदार डोळे बंद करून मतदान करतील.अनेक पक्षांचे अनेक उमेदवार निवडणूक रिंगणात असतात.निवडून मात्र,आधी नगरसेवक होते तेच पुन्हा निवडून येतात.असे काय घडते की माजी नगरसेवक आजी होतो.पक्ष जरी वेगवेगळा असला तरी काही वेळा मैत्री साथ देते.एखादा हुशार उमेदवार असेल तर पक्ष त्यांच्यासाठी मेहनत घेऊन तडजोड करतो.कमकूवत , नाममात्र उमेदवार उभा करतो.तर काही ठिकाणी उमेदवार स्वतःच मतदार संघ बांधतो म्हणजे अर्थपूर्ण लढती होतात.तर काही ठिकाणी साम, दाम दंड भेद सुत्राचा वापर केला जातो.निवडणूक निकाल जाहीर होण्याआधी अशा उमेदवारांचे निकाल स्पष्ट होतात.पुढची तयारी सत्तेतील मोठी पदे मिळवण्याची असते.पक्ष देखील तत्वतः मान्य करतो आणि आपली सत्ता आली म्हणून समाधान मानतो.मैत्रीपूर्ण , अर्थपूर्ण लढती नंतर मात्र मतदार एक दिवस मतदान करून खूष होतो.निवडून आलेला उमेदवार पुढे पाच वर्षांनी निवडणुकीत दारात येतो.यालाच मैत्रीपूर्ण लढत म्हणायचे काय ? असे उमेदवार आपल्या मतदारसंघात विकास कामे करण्यासाठी झटतील , मतदारांना न्याय देतील असे समजावे काय ? पक्षाच्या नेत्यांनी विचार करून उमेदवारी द्यावी. जेणे करून पक्ष टिकेल,वाढेल.सत्तेत वाढ होईल.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९** mahadeogolvaskargmail.com

## पान १ वरुन

### नैसर्गिक अनुदान ...

हजर केले असता न्यायालयाने दोन्ही आरोपीताना दिनांक १० डिंसेबर पावेतो पिसीआर मंजुर केली आहे. पाहीजे आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कामगीरी ही मा. श्री अजयकुमार वंन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

### बस स्थानक परिसरात ...

असूनही कोणत्याही ट्रॅव्हल्सवर दंड नाही, कारवाई नाही. रात्रीच्या वेळेस काही अधिकाऱ्यांकडून चिरीमिरी घेतली जाते, असा सरळ आरोप मनसेने केला आहे. जर हे खरे असेल, तर हे फक्त वाहतूक नियमभंग नसून नागरिकांच्या जीवाशी खेळण्याइतका गंभीर गुन्हा आहे.

**नागरिकांचे प्रश्न प्रशासनाला**

बस स्थानक MSRTCचे अधिकारी त्यांच्या परिसरात खाजगी ट्रॅव्हल्सना येथे प्रवेशच का? वाहतूक शाखेचे अधिकारी काय करत आहेत? रोजचे अपघात, कोंडी याला जबाबदार कोण? कलेक्शनसाठी अंध डोळे केले जात आहेत का?

मनसेचे जिल्हा सचिव विलास तिकांडे यांनी स्पष्ट चेतावणी दिली आहे की, ट्रॅव्हल्सचा विना-अनुमती प्रवेश ४८ तासांत बंद करा, रात्रीची वाहतूक रचना बदलून तत्काळ नियम लागू करा, अपघातांचे सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर कारवाई करा. चिरीमिरी घेणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा. अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन हमखास होईल. वाहतूक शाखेच्या कार्यालयापुढे ठिय्या घेऊन जनआंदोलन उभा करू.

जालना बस स्थानक परिसरातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. हे फक्त वाहतूक कोंडीचे प्रकरण नाही हा नागरिकांच्या जीवाशी थेट संबंध असलेला प्रश्न आहे. म नसेचा इशारा स्पष्ट आहे. आता बॉल प्रशासनाच्या कोर्टात आहे. तात्काळ कारवाई झाली नाही तर परिस्थिती मनसेच्या आंदोलनाने तापण्याची शक्यता प्रबळ आहे.

### पतीच्या तोलामोलाचे ...

दोघेही विभक्त राहत होते.

सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, पती आणि पत्नीमधील नातेसंबंधात इतकी कटुता आली आहे की ते पुन्हा एकत्र येणे शक्य नाही. त्यामुळे घटस्फोटाचा निर्णय कायम ठेवणे दोघांच्याही हिताचे आहे. न्यायालयाने म्हटले, वैवाहिक संबंध सुरू ठेवल्याने पती-पत्नी किंवा त्यांच्या मुलाचे कोणतेही भले होणार नाही; उलट, यामुळे केवळ वैर वाढेल आणि त्यांना सन्मानाने पुढे जाण्यापासून रोखले जाईल.

पोटगीच्या रकमेवर निर्णय देताना न्यायालयाने पतीचे उत्पन्न, सामाजिक दर्जा आणि भविष्यातील शक्यता विचारात घेतल्या. न्यायालयाने स्पष्ट केले की, सध्या वकिली न करणाऱ्या पत्नीला, तिच्या वैवाहिक जीवनात उपभोगलेल्या राहणीमानाशी सर्वसाधारणपणे सुसंगत राहणीमान राखण्याचा हक्क आहे.

उच्च न्यायालयाने दिलेली ३० लाख रुपयांची रक्कम अपुरी असल्याचे नमूद करत, सर्वोच्च न्यायालयाने ती वाढवून ५० लाख रुपये केली. ही रक्कम पतीने तीन महिन्यांच्या आत पत्नीला द्यावी, असे आदेश दिले आहेत. ही रक्कम कायमस्वरूपी पोटगी म्हणून अंतिम असेल आणि यानंतर पत्नीचे पतीच्या संपत्तीवर किंवा इतर गोष्टींवर कोणतेही आर्थिक हक्क राहणार नाहीत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

**महिला आणि समाजासाठी आवाहन**

ॲड. महेश एस. धनावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले की, हा निकाल केवळ एका खटल्यापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण स्त्री वर्गाला आत्मविश्वास देणारा आहे. पती कितीही मोठ्या पदावर असला तरी पत्नीच्या हक्कांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, हा एक मोठा संदेश यातून मिळतो. जालना जिल्ह्यातील न्यायालयात पोटगीसाठी संघर्ष करणाऱ्या अनेक महिलांसाठी हा निकाल अत्यंत महत्त्वाचा आणि दिशादर्शक ठरू शकतो. या निकालाचा आधार घेऊन त्या आपला हक्क अधिक प्रभावीपणे मांडू शकतील.

## सत्यशोधक विद्यालय येथे जीवशास्त्र विषयाचे मार्गदर्शन संपन्न



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** मानव विकास व पुर्ननिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव येथे आज दिनांक ०५ डिसेंबर २०२५ रोजी जीवशास्त्र विषयाच्या श्रीमती.ज्योती ताटेवर यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.श्रीमती जया गुजर यांनी करून दिला. श्री. जिंदमवार हे ही उपस्थित होते. मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयाची तयारी करण्यासाठी त्याचा योग्य वेळापत्रक तयार करून बेसिक कॉन्सेप्ट समजून घेतल्या पहिजे व योग्य नियोजन करून विषयाची तयारी करावी असे त्यांनी मत मंडले,पुढे त्यांनी छएएढ ह्या मेडिकल एन्टरन्स विषयी मार्गदर्शन केले.छएएढ चा सिलॅबस व मार्कांचे वर्गीकरण त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिले.त्या नंतर त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शिस्त ही स्वतः ला लावून घ्यावी व त्यात सातत्य ठेवावे नंतर त्यांनी समर्पण ह्या विषयी सांगितले जसे की तुम्ही स्वतःचे जे ध्येय निश्चित केले असेल त्यात पूर्ण पणे समर्पित करून घ्यावे असे त्यांनी सांगितले.त्या नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. फूके यांनी अध्यक्षीय भाषण केले त्या मध्ये त्यांनी जे आज पर्यंत झालेले मार्गदर्शन तासिकेचे ज्ञान आत्मसातकरून आपल्या अभ्यासक्रमात सुधारणा करावी असे मत व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. श्रीमती जया गुजर यांनी परिश्रम घेतले .प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रा.संदीप फुके यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्री.पांढरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री.लहाने यांनी केले.कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री.सुनीलजी वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) च्या शहराध्यक्ष पदी शेख आरेफ यांची निवड

**विशाल देशमुख**
**भोकरदन । प्रतिनिधी -** शहरातील दानापूर वेस भागातील रहिवासी शेख आरेफ गुलाम नबी यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)पक्षाच्या भोकरदन शहराध्यक्ष पदी पक्षाचे जालना जिल्हाध्यक्ष माजी आ अरविंद चव्हाण यांनी केली आहे.

याबाबत दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की,आपली भोकरदन शहराध्यक्ष पदी निवड करण्यात आली असून पक्षाच्या वाढीसाठी व पक्षाची ध्येय धोरणे सर्वासामान्य जनते पर्यंत पोहचविण्यासाठी पक्षाला आपले सहकार्य राहील असा मला विश्वास आहे.

पक्षाध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना अजित पवार,खा प्रफुल्ल पटेल,प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे व जिल्हाध्यक्ष माजी आ अरविंद चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आपल्या भागात पक्ष संघटन वाढविण्यासाठी कटीबद्ध व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

नियुक्तीपत्र देताना भोकरदन -जाफ्राबाद विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष माजी सभापती लक्ष्मणराव दळवी, युवा नेते केशव जंजाळ आदींची उपस्तिती होती.

शेख आरेफ यांची शहराध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे.



## सहकार क्षेत्रासाठी आत्मविश्वास महत्त्वाचा - अभय चव्हाण

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** स्वामी विवेकानंद को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड किनगाव जट्टू तालुका लोणार जिल्हा बुलढाणा संस्थेचे उद्धाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय चव्हाण, संस्थापक अध्यक्ष मुकुंद आवटी, टेंभुर्णी चेअरमन संजय महाजन तसेच प्रमुख पाहुणे अशोक लोढा, विश्वनाथ वाघमारे, शामराव सातपुते, बाबूजी पिराजी मुंडे, अल्केश सोमानी यांची उपस्थित होती. यावेळी अरुण केनेकर, पांगरी राजेंद्र खंदाडे, सुरेश आवटी, कैलास वर्गणे, सागर सपकाळ, अविनाश राऊत, नरेंद्र कांबळे, निवृत्ती मोरे, जयश्री आवटी, दिपाली आवटी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

## प्रज्ञा सूर्याच्या दिव्य तेजासमोर भारतासह अवघे जग नतमस्तक

बोरघर । माणगाव । प्रतिनिधी - विश्वरत्न, महामानव, बोधीसत्व, प्रज्ञा सूर्य, प्रकांड पंडित, विद्येचे महामेरू, अथांग ज्ञानाचा महासागर, भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. ०६ डिसेंबर याच दिवशी आधुनिक भारताचे शिल्पकार, थोर कायदेतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, संसदपटू, महान लेखक, पत्रकार, संपादक, महान तत्त्वज्ञ, शिक्षणमहर्षी, बॅरिस्टर, मनुस्मृतीचे निर्दालक, तमाम भारतीयांचे भाग्यविधाते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे १९५६ रोजी दिल्ली येथील निवासस्थानी त्यांचे निधन झाले. या दिवसाला महापरिनिर्वाण दिन असे संबोधले जाते. ०६ डिसेंबर हा माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून देणाऱ्या महान मानवतावादी समता दूताचा आणि एका प्रखर राष्ट्रभक्ताच्या, निस्सीम देशभक्ताच्या निधनाचा दिवस. त्यामुळे ०६ डिसेंबर हा दिवस संपूर्ण देश विदेशात दुःखाचा दिवस म्हणून समजला जातो.

या दिवशी संपूर्ण देश विदेशातून लाखोंच्या संख्येने बौद्ध धम्म अनुयायी,भीमसैनिक, लोकप्रतिनिधी, राजकीय नेते, आमदार, खासदार, मुख्य मंत्री,उप मुख्यमंत्री, राज्यपाल , प्रधानमंत्री, राष्ट्रपती आणि विविध खात्यांचे मंत्री ०६ डिसेंबर ला मुंबई येथील दादर चैत्यभूमी आणि देश विदेशात ज्या ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे, स्मारक आणि त्यांनी आपल्या आयुष्यभर केलेल्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात केलेल्या क्रांतीच्या ऐतिहासिक ठिकाणी जाऊन त्यांच्या प्रेरणादायी पुतळ्याला विनम्र अभिवादन करून कृतज्ञतापूर्वक नतमस्तक होतात. याच पार्श्वभूमीवर या वर्षी ०६ डिसेंबर रोजी मुंबई येथील दादर चैत्यभूमी, नागपूर दिक्षाभूमी,महाड क्रांतीभूमी, आणि देश विदेशातील डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारके, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शासकिय संस्था व सरकारी, निमसरकारी शाळा, महविद्यालये, कार्यालयात, प्रत्येक विहारात आणि घराघरात विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना व प्रतिमांना आदराने सन्मानपूर्वक पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करून देश विदेशासह अवघे जग नतमस्तक झाले.



## भिक्यु शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो यांचे आंतरराष्ट्रीय महापिरत्राणासाठी बौध्दगया येथे प्रस्थान




**जालना । प्रतिनिधी –** जालना येथील नागेवाडी बुध्दविहारचे सचिव भिक्यु शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो यांचे आंतरराष्ट्रीय महापिरत्राणासाठी बौध्दगया येथे प्रस्थान झाले. त्यानिमित्त जालना रेल्वे स्थानक येथे दि. २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता त्यांचे बौध्द उपासक व उपासिकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी शिवलाल गाडगे, मॉ सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब वानखेडे, सदानंद टवले, रविंद्र शिंदे, कविता बुक्तरे, कांताबाई सदावर्ते, प्रयागबाई मगरे, ड. उमाकांत धर्मा पैठणे, बालकिशन धर्मा पैठणे, कमलाबाई पारधे, रंजनाबई शिरसाठ, सय्यद सलमान, विशाखा टवले, सायली मगरे, श्रीमती वाहुळे, अशोक पंडीत, कांताबाई रत्नपारखे, सुभाष पोघरे, भिमराव पांडव, प्रदिप रत्नपारखे, अनिल वाघमारे, संतोष गायकवाड,अक्षदा पंडीत, गौतम वानखेडे आदिंची उपस्थिती होती.



**बोधिसत्व, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी विनम्र अभिवादन करतांना कन्हैयानगर येथील समाज बांधव (छायाचित्र -किरण खानापुरे)**

## सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

**विशाल देशमुख**
**.जाफराबाद -** येथील सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ शाम सर्जे यांनी भूषविले,या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे प्रा.मनिष बनकर हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रा.अनिल वैद्य यांनी उपस्थितांनकडून त्रिशरण पंचशील वधवुन घेतले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा मनिष बनकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या रुपाने देशातील सामान्य जन मानसाला कसा न्याय मिळवून दिला हेही आपल्या भाषणांतून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ शाम सर्जे यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कामगीरीवर प्रकाश टाकला.ते म्हणाले डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण देशात विविध प्रकारचे कार्य केले आहे. हे देश विसरुच शकत नाही.याच कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयातील प्रा.अनिल वैद्य यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भिमगीत गाऊन अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.संतोष पहारे यांनी केले.तर आभार प्रदर्शन प्रा.संदीप पाटील यांनी केले.कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विनोद हिवराळे यांची उपस्थिती होती,तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.






## संजीवनी इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे महापरिनिर्वाण दिवस साजरा

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी –** जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथील संजीवनी इंग्लिश स्कूल मध्ये महापरिनिर्वाण दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक प्रा सतीश जाधव सर हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शाळेच्या शिक्षिका शीला जाधव मॅडम होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन वैशाली पंडित मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन भाग्यश्री जाधव मॅडम यांनी केले. काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये शिवांश गलबले व समृद्धी बकाल यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हिना शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.




**जालना येथे दुखी नगर भागात बाबरी मशिद विध्वंसला ३३ वर्ष झाले त्याच्या निषेधार्थ रजा अकॅडमीतर्फे दुपारी सामूहिक अजानचे पठण करण्यात आले. यावेळी रजा अकॅडमीचे अध्यक्ष मौलाना जमील अहमद रज्वी यांच्यासह इकबाल पाशा खान, शाहलम खान, मुनव्वर खान, मोहम्मद माजेद, अमजद खान, फिरोज बागवान, जमील रज्वी, रेहान अहमद. (छाया/जावेद तंबोली)**

# राज्यघटनेने धर्म स्वातंत्र्य दिल्यामुळेच लोकशाही टिकली - अरविंद चव्हाण

## डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत विविध जाती आणि धर्माच्या लोकांना न्याय दिल्यामुळे सर्वधर्मीय आपापल्या धर्माचे पालन करण्यासाठी स्वतंत्र आहेत परंतु अलीकडच्या काळात काही मंडळी कडून जातीयतेचे विष पेरले जात असल्यामुळे समता आणि बंधुत्वाची मोठी हानी झाली असल्याचे जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी सांगितले.

जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पार्टीच्या वतीने ६ डिसेंबर २०२५ शनिवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जिल्हा पक्ष कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता , त्यावेळी श्री चव्हाण हे बोलत होते ते पुढे बोलताना म्हणाले की , शिव , शाहू , फुले , आंबेडकर यांच्या विचाराने राज्यांमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे वाटचाल करीत आहेत या समतेच्या विचारांशी पक्ष कधीही तडजोड करणार नाही अशी भूमिका श्री पवार यांची असल्याचे त्यांनी सांगितले .

याप्रसंगी जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शेख मेहमूद अभिवादन पर बोलताना म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय राज्यघटना जगातील आदर्श राज्यघटना आहे राज्यघटना टिकली तरच लोकशाही टिकेल म्हणून घटनेचे संरक्षण करणे हे भारतीयांचे कर्तव्य असल्याचे श्री. शेख म्हणाले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जेष्ठ नेत्या शकुंतला ताई कदम ,अण्णासाहेब चितेकर , मिर्झा अन्वर बेग , महिला शहर अध्यक्षा रीकंल तायड , प्रभाकर घेवंदे , सोपानराव तेलगड , आदिंनी अभिवादन पर आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले याप्रसंगी शितल ताई बारोटे , मनकर्णा ताई डांगे , संगीता नागरगोजे , शिवराज जाधव , बबन गाडेकर , विजय सोनवणे ,शिवचरण बाळराज , शेख. इमरान बिल्डर , सतीश वाहुळे , सय्यद जावेद अली , शेख. सोहेल , शेख.शोहेब , मिर्झा आमेर , राहुल भगत , गणेश नवपुते , गजेंद्र सुपेकर , ज्ञानेश्वर क्षीरसागर , संतोष निकाळजे आदि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रभाकर घेवंदे यांनी केले .



# संविधान हि राष्ट्राची सर्वात मोठी शक्ती -भास्कर दानवे




**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी जालना महानगर यांच्या वतीने मस्तगड, कान्हैय्यानगर व भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास भाजपा जालना जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, युवा नेते अक्षय भैया गोरंटयाल, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, सिद्धिविनायक मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार, सामाजिक न्याय व स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग मिळाला आहे. त्यांचे विचार आणि कार्य ही आपल्या राष्ट्राची सर्वात मोठी संपत्ती आहे. समाजातील तळागाळातील व्यक्तीचा विकास व्हावा यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. महापरिनिर्वाण दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर संविधानातील मूल्यांची उजळणी करून ती प्रत्यक्षात जगण्याची प्रतिज्ञा करण्याचा दिवस आहे असेही त्यांनी यावेळी म्हटले. यावेळी सुनील पवार, अमोल कारंजेकर, देविदास देशमुख, राजेश जोशी, शिवप्रकाश चितळकर, जिवन सले, विजय पवार, कपिल दहेकर, गेंदालाल झुंगे, सुहास मुंडे, मनोज बिडकर, सुमित सुरडकर, आनंद झारकंडे, बाबुराव भवर, सागर वाहूळकर, शाम जाधव, जगदीश येनगुपटला, शिवराज जाधव, नारायण पवार, डोंगरसिंग साबळे, मुकेश चव्हाण, सुरेंद्र शेडूते, शाम जाधव, राजेश देसार आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



**महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विन्रम अभिवादन करतांना शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे दिपक रणनवरे, माजी नगसेवक गणेश घुगे, युवासेना विस्तारक भरत सांबरे, संदीप झारखंडे, संतोष क्षत्रिये, अजय रोडिये आदी.**

# सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना

## महाराष्ट्र जिल्हा परिषद मागासवर्गीय शिक्षक संघटनेचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर मुंबई येथे जाणाऱ्या समाजबांधवांसाठी रेल्वे स्टेशन जालना येथे महाराष्ट्र जिल्हा परिषद मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या जिल्ह्या शाखेच्या वतीने दिनांक ५/१२/२०२५ला दुपारी १२-00 ते रात्री १0.00 वाजेपर्यंत अल्पोपहार वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन रेल्वे प्रोटेक्शन फोर्स चे पोलीस निरीक्षक आयुष्यमान पवन इंगळे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गंगाधर जी राजकर, अण्णासाहेब खिल्लारे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष गाडगे, श्री मधुकर घेवदे श्री किशोर माघाडे ,माजी शिक्षण विस्तार अधिकारी बी जे बोर्डे, श्री राजेंद्र कायंदे ,मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री सिद्धार्थ गजभिये, श्री संजय साळवे श्री अनिल गवई, श्री स्वामीनाथ सपकाळ, श्री ज्ञानेश्वर सोनवणे,विष्णु जाधव, श्री सचिन गंगावणे, भीमराव भालेराव,अविनाश दांडगे, प्रकाश मगरे, आत्माराम सुखधाने, प्राध्यापिका डॉ. जयश्री गायकवाड ,डॉ. पुष्पा कोकाटे ची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अल्पोपहार वाटप करून सुरुवात करण्यात आली

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती हर्षा लांडगे, श्रीमती रंजना वाहुळे, श्रीमती सुषमा गजभिये,वंदना इंगळे, साधना नगराळे, श्रीमती रंजना काकडे, श्रीमती उषा काकडे , श्रीमती सीमा वरशील,नंदीनी वरशील, सुमेध गजभिये, राज पाटील, राज वरशील, रोहन भोरजार यांच्यासह बहुसंख्य शिक्षकांनी परिश्रम घेतले.या सामाजिक उपक्रमास शिक्षक भारती संघटनेचे पदाधिकारी श्री देवेंद्र बारगजे, महाराष्ट्र शिक्षक समितीचे पदाधिकारी रघुनाथ वाघमारे, श्रीपाद मांडे, श्री विष्णू सर, श्री दिनेश एखंडे, श्री डुंबरे सर, डॉक्टर पंजाबराव शिक्षण परिषदेचे राज्याध्यक्ष श्री लक्ष्मण नेवल, प्रशांत सोळंके, अखिल प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी श्री प्रदीप घाटेशाही, श्री बोरुडे सर या सर्वांनी सामाजिक उपक्रमास भेट देऊन या कार्यक्रमाचे कौतुक केले.



# ४३६ कोटींची कामे नियमबाह्य व टक्केवारी घेऊन वाटप

## पालकमंत्र्यांवर कारवाई करा; भाऊसाहेब गोरें मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** जालना जिल्हा नियोजन समिती कायद्यानुसार जालना जिल्हा नियोजन समितीची रचना झालेली नसून जवळपास ४३६ कोटी रुपये खर्चाची विविध विकासकामे नियमबाह्य पद्धतीने देण्यात आल्याचा आरोप करत ही कामे रद्द करुन पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाऊसाहेब गोरे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिकेद्वारे केली आहे.

पर्यावरण, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या जालन्याच्या पालकमंत्री असल्या तरी त्यांचे कार्यालय जालन्यात सुरु झालेले नाही. त्यांनी ओएसडी नेमलेला नाही. जिल्ह्याकडे त्यांचे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या त्या पदसिद्ध अध्यक्ष असून, जिल्हाधिकारी या सचिव आहेत. मात्र, विकासकामे करताना पालकमंत्र्यांनी केवळ आर्थिक हित जोपासून तब्बल ४३६ कोटी रुपयांची विकासकामे टक्केवारी घेऊन ठराविक लोकांनाच देण्यात आल्याचा गंभीर आरोप गोरे यांनी केला आहे.

त्यामुळे त्यांची निवड रद्द करुन पालकमंत्री पद हे इतराकडे द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या याचिकेत जालना जिल्हा नियोजन समितीच्या रचनेबाबत गंभीर आक्षेप नोंदवले असून, पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केलेले निधी वाटपाचे आदेश रद्द करण्याची विनंती याचिकेत करण्यात आली आहे. याचिकेत नमूद केले आहे की जिल्हा नियोजन समितीची रचना महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती कायदा १९९८ च्या तरतुदींनुसार झालेली नाही.



सत्ताधारी पक्षातील काही आमदार यात सामील आहे व माझी इच्छा नसतांना दोन कोटीच्या कामासाठी १० टक्के माझ्याकडून पण घेण्यात आले वेळप्रसंगी त्या आमदारांचे नाव पण जाहीर करणार राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब गोरे यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले आहे.



**महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुष्पहार अर्पण करुन विन्रम अभिवादन करतांना शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे, योगेश रत्नपारखे, अण्णासाहेब बाळराज, जय खरात, छाया कोळे यांच्यासह समाज बांधव.**



**संविधान (रॅली) स्तंभ समितीच्या वतीने जालना येथील शासकीय पुतळा महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी डिवायएसपी अनंत कुलकर्णी व सर्व पोलिस अधिकारी, समितीचे अध्यक्ष दिनकर घेवंदे, इकबाल पाशा, ॲड ब्रम्हानंद चव्हाण, ॲड. आदमाने, रमेश देहेडकर, शाह आलम खान, काशिनाथ मगरे, राम गायकवाड, अरविंद देशमुख, अशोक पडूळ, योगेश रत्नपारखे, फकिरा वाघ यांच्यासह शेकडो भीम अनुयायी अभिवादन करण्यासाठी उपस्थित होते.**

# जालना समाजकार्य महाविद्यालयांमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयात दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक विभागाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजकुमार म्हस्के हे उपस्थित होते. या कार्यक्रमात सर्वप्रथम प्राचार्य डॉ.राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.यानंतर प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के व प्रा.डॉ. दिपक बुक्तरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी रमेश गजर,उप प्राचार्य प्रा.डॉ.मधु खोब्रागडे,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. दिपक बुक्तरे,प्रा.डॉ. मीना बोर्डे, डॉ. रेणुका बडवणे,जगन्नाथ मलवार,प्रकाश दांडगे, अनिल हजारे, विष्णू भोसले, राधाकृष्ण देशमुख, श्याम कांबळे,संजय गोरे,आदी उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.